आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१२ जून २०२४ - बुधवार

नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. ग्रेस मार्कशिवाय मिळालेले गुण या विद्यार्थ्यांना कळवले जातील आणि त्यांना २३ जून रोजी पुन्हा परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करुन देणार असल्याची माहिती केंद्र सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयात दिली. ज्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यायची नसेल त्यांचे ग्रेस मार्कांशिवाय मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील. २३ जून रोजी होणाऱ्या परीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर केला जाईल, असंही सरकारनं आज सांगितलं. ग्रेस गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणांची पडताळणी करण्यासाठी सरकारनं एक समिती स्थापन केली आहे. त्या समितीच्या शिफारसींनुसार सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांनी आज राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, नरहरी झिरवाळ, मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते. दरम्यान, या उमेदवारीसाठी माझ्यासह तेरा जण इच्छुक होते, पण पक्षात सर्वांच्या सहमतीने सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय झाला, अशी माहिती पक्षाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

दरम्यान, मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेने शिवाजी शेंडगे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

**<><><><><>**

नागपुरात धामणी परिसरात स्फोटकांच्या कंपनीत झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. दुपारी झालेल्या या स्फोटात काही जण जखमी झाल्याचंही वृत्त आहे. चामुंडा एक्स्प्लोझिव्ह कंपनीत ही दुर्घटना घडली. पोलिस आणि स्थानिक बचाव पथक याठिकाणी मदत कार्य करतं आहे.

<><><><><>

आषाढी एकादशी निमित्त संत गजानन महाराजांची पालखी बुलढाणा जिल्ह्यातल्या शेगाव इथून पंढरपूरकडे आज सकाळी रवाना झाली. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराजांच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांशी संवाद साधला. भाजपा शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

<><><><><>

अधिक दरानं बियाण्याची विक्री करणाऱ्या अकोल्यातल्या राजस कृषी केंद्रावर जिल्हा गुणवत्ता नियंत्रण आणि मोहीम अधिकाऱ्यांनी काल कारवाई केली आणि विक्रेत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

<><><><><>

एसटी अर्थात राज्य परिवहन महामंडळामध्ये काम करणाऱ्या चालक-वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. महामंडळानं आज एका

पत्रकाद्वारे ही माहिती दिली. यामुळे बदल्यांबाबतचे विविध आक्षेप कमी होणार असून सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी शक्य होणार आहे, असा दावा महामडळानं केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इटलीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते अपुलिया इथं उद्या होणाऱ्या जी सात देशांच्या शिखर परिषदेत भाग घेणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विनय क्वात्रा यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. या शिखर परिषदेच्या निमित्ताने जी सात राष्ट्रांच्या नेत्यांशी प्रधानमंत्री मोदी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

कुवेतच्या मानगाफ परिसरातल्या इमारतीला काल लागलेल्या आगीत ४० भारतीय कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये केरळच्या २४ कामगारांचा समावेश आहे. या अपघातातल्या मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपये तसंच जखमींना एक लाख रुपये देण्य़ाची घोषणा केरळ सरकारनं आज केली आहे. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री किर्ती वर्धन सिंग यांनी आज कुवेतमध्ये जखमींची भेट घेतली.

**<><><><><>**

नॅशनल जिओग्राफिकचा बिली अँड मॉली - अँन ऑटर लव्ह स्टोरी हा माहितीपट १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित होणार आहे. येत्या १५ जून ते २१ जून या कालावधीत  होणाऱ्या या महोत्सवात पहिल्याच दिवशी हा माहितीपट दिल्ली, कोलकाता, चेन्नई आणि पुणे इथं एकाच वेळी प्रदर्शित होईल.

**<><><><><>**

इटली इथं सुरु असलेल्या पेरुगिया चॅलेंजर टेनिस स्पर्धेत भारताच्या सुमित नागलनं काल पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उप उपांत्यपूर्व फेरीत त्यानं ॲलेसेंड्रो जियानेसीचा ०-६, ७-५, ७-६ असा पराभव केला.

आज संध्याकाळी पुरुष दुहेरीच्या उप उपांत्य फेरीत भारताचा एन. श्रीराम बालाजी आणि त्याचा जर्मन जोडीदार आंद्रे बेगेमन यांचा सामना नेदरलँड्सच्या जेस्पर डी जोंग आणि रायन निजबोअर यांच्याशी होईल.

**<><><><><>**